## लक्षवेधी सूचना

श्री.हरिसिंग राठोड, वि.प.स यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.६७० पुढीलप्रमाणे आहे.

" राज्य सरकारचे मागासवर्गीयांना बढती मध्ये आरक्षणाचे धोरण असणे, सन २००४ साली विधीमंडळाने कायदा संमत करून मागासवर्गीयांच्या एकूण आरक्षण, सरळसेवा भरती, बढतीमधील आरक्षणाच्या बाबतीत निर्णय घेऊन, संविधानाच्या तरतुदी प्रमाणे, मागासवर्गीयांना सर्व टप्प्यांवर आरक्षण लागू करणे, हे धोरण राबवित असतांना, विजय घोघरे विरूध्द महारष्ट्र शासन अशी यांचिका दाखल करून मागासवर्गीयांच्या बढती मधील आरक्षणाला स्थगिती मिळाल्यानंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयातून परत मुंबई न्यायालयातकडे येणे, मुंबई उच्च न्यायालयाने हे प्रकरण मॅट न्यायालयाकडे पाठविणे, मॅट न्यायालयाने विधीमंडळाने पास केलेला कायदा रद्द करणे, या सर्व प्रकारामुळे मागासवर्गीय समाज संपूर्णतः हादरून गेलेला असणे, त्यातच मुंबई उच्च न्यायालयाने दि. ४ ऑगस्ट, २०१७ राजी एकीकडे मॅटचा निर्णय रद्द बदल करून सन २००४ चा कायदा अबाधित ठेवणे, परंतु महाराष्ट्र शासनाने दिलेल्या मागासवर्गीयांचा डाटा, दोघा न्यायाधिशापैंकी एका न्यायाधिशाला योग्य वाटणे, तर दुसऱ्या न्यायाधीशाला अयोग्य वाटणे, यासंदर्भात पुढील न्याय देण्याकरीता आणखी एका न्यायाधिशाची नेमणूक करण्यात येणे, आणि या प्रकरणात, सर्वोच्च न्यायालयातील एम नागराजन प्रकरणाचा दाखला देत पदोन्नती मधील आरक्षण थांबविणे, या नंतर महाराष्ट्र शासनाने तत्परता दाखवून दि. २९ डिसेंबर, २०१७ रोजी परिपत्रक काढून व तत्परतेने लागू करून सर्व स्तरावरील मागासवर्गीयांचे आरक्षण थांबवून खुल्या वर्गाला मात्र तत्परतेने सर्वत्र बढती देणे हा एकूण प्रकार मागासवर्गीयांसाठी संतापजनक असणे, अलिकडे दि. ५ जून, २०१८ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने एम.नागराजन व विजय घोघरे प्रकरणाचा उल्लेख करून मागासवर्गीयांचे थांबविलेले सर्व आरक्षण चालू करण्याबाबत आदेश देणे, त्यानंतर केंद्र सरकारने यासंदर्भात पत्रक जारी करून सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपिठाचा निर्णय येईपर्यंत मागासवर्गीयांना बढती मध्ये आरक्षण सुरू ठेवण्याबाबत आदेश देणे, या आदेशामुळे सर्व राज्य सरकारांनी याची अमंलबजावणी करावी असे स्पष्ट आदेश दिले असतानाही राज्य सरकार मात्र याबाबत चालढकल करीत असून मागासवर्गीयांवर अन्यायाची मालिका चालू असणे, यामुळे निमार्ण झालेली असुरक्षिततेची भावना तसेच संविधानाची होत असलेली पायमल्ली, संविधानामध्ये बढतीमध्ये आरक्षण देण्याची सुस्पष्ट तरतूद असताना सरकार मात्र घटनाबाहय कार्य करीत असून वेळकाढूपणा करून मागासवर्गीय आधिकारी, कर्मचाऱ्यांवर अन्याय करीत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

## मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन

राज्य शासनसेवेत दिनांक २५.०५.१९७४ च्या शासन निर्णय अन्वये पदोन्नती मध्ये वर्ग १ च्या पहिल्या टप्प्या पर्यंत आरक्षण विहित करण्यात आले होते, सदर पदोन्नती मधील आरक्षण सन २००१ चा

अधिनियम निर्गमित होईपर्यंत सुरू होते. तद्नंतर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूची जमाती, (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग व इतर मागासवर्ग यामधील व्यक्तींसाठी लोकसेवांच्या आणि पदामधील रिक्त जागांच्या आरक्षणाकरिता आणि तत्संबंधीत व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता दिनांक २२.०१.२००४ पासून आरक्षण अधिनियम २००१ हा कायदा प्रसिध्द करण्यात आला व त्याची अंमलबजावणी दिनांक २९.१.२००४ पासून सुरू आहे. सदर अधिनियमातील कलम ५(१) अनुसार पदोन्नतीमधील सर्व टप्प्यांवर आरक्षणाची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने कलम ५ (१) ची अंमलबजावणी करण्यासाठी दिनांक २५.५.२००४ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर अधिनियमास व शासन निर्णयास मा. न्यायालयात आव्हानित करण्यात आलेले होते.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक ०४.०८.२०१७ रोजी शासकीय सेवेत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या विमुक्त जाती / जमाती, विशेष मागासप्रवर्ग यांना पदोन्नती मधील आरक्षण देण्यासंदर्भातील राज्य शासनाचा दिनांक २५.०५.२००४ चा शासन निर्णय रद्दबातल करून पदोन्नती मधील आरक्षण अवैध ठरविले आहे. मा. उच्च न्यायालयाने उक्त आपल्या निर्णयावर कार्यवाही करण्यासाठी १२ आठवडयांची स्थगिती दिली होती. मा. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाविरूध्द राज्य शासनाने विहित मुदतीत १२ आठवड्यांचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वीच मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्रमांक २८३०६ / २०१७ अन्वये आव्हानित केले आहे. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाच्या वतीने प्रभाविपणे बाजू मांडण्यासाठी जेष्ठ विधिज्ञ श्री. हरिश साळवे, श्री. के.के.वेणुगोपाल, ॲटर्नी जनरल ऑफ इंडिया, श्री. तुषार मेहता, ॲडीशनल सॉलिसिटर जनरल व श्री. श्रीराम पिंगळे यांची विशेष समुपदेशी म्हणून तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाकडून मदतीकरिता एस.के. लिगल असोसिएट, जेष्ठ विधीज्ञ गुरुमुर्तीकुमार व ॲड दिवाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पदोन्नती मधील आरक्षणांच्या समर्थनार्थ आवश्यक सर्व कागदपत्रे व संख्यात्मक माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मा. उच्च न्यायालयाने आपल्या दिनांक ०४.०८.२०१७ रोजीच्या निर्णयास १२ आठवड्यांची स्थगिती दिली होती. स्थगितीच्या कालावधी मध्ये पदोन्नती मधील आरक्षणान्वये पदोन्नती देण्याची आदेश निर्गमित करण्यात आले होते. मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका क्रमांक २८३०६ /२०१७ प्रकरणी दिनांक ०४.०८.२०१७ रोजी झालेल्या सूनावणी दरम्यान मा. उच्य न्यायालयाच्या आदेशास स्थगिती देण्याबाबत अथवा जैसे थे ठेवण्याबाबत विनंती केली असताना मा. न्यायालयाने कोणतेही आदेश दिलेले नाहीत. मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ०४.८.२०१७ च्या आदेशाचा अवमान होवू नये यास्तव मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश होईपर्यंत सर्वस्तरावरील पदोन्नती प्रक्रीया स्थगिती ठेवण्यात यावी व सदर प्रकरणी पुढील सुनावणीच्या वेळी मा. सर्वोच्च न्यायालयामार्फत दिल्या जाणाऱ्या आदेशाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे आदेश दिनांक ०२.११.२०१७ च्या पत्रान्वये निर्गमित करण्यात आले होते.

विशेष अनुमती याचिका क्रमांक २८३०६/२०१७ वर दिनांक १३.११.२०१७, १५.११.२०१७ व ११.०७.२०१८ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयात सुनावणी ठेवण्यात आली होती. दिनांक ५.६.२०१८ रोजी

झालेल्या सुनावणीत विशेष अनुमती याचिका क्रमांक २८३०६/२०१७ विशेष अनुमती याचिका क्रमांक ३०६२१ / २०११ सोबत जोडण्यात आली आहे. केंद्र शासनाने एस. एल. पी.क्र. ३०६२१/२०११ या प्रकरणी दिनांक ५.६.२०१८ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने दिनांक १५.६.२०१८ रोजीच्या परिपत्रकान्वये आरक्षणानुसार पदोन्नती देण्याबाबत आदेश निर्गमित केले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यास त्यांनी सर्व केंद्रशासनाचे कार्यालय व राज्य शासनास सुचना दिलेल्या आहेत. याबाबत राज्याचे मा. महाअधिवक्ता यांचे अभिप्राय मागविले असता त्यांनी सदरचे आदेश केवळ केंद्र शासना पुरतेच मर्यादित आहेत. केंद्र शासनास न्यायालयीन आदेशात फेरफार करण्याचा कोणताही अधिकार नाही. त्यामुळे केंद्रशासनाच्या दि. १५.०६.२०१८ चे कार्यालयीन आदेश यांच्या आधारे पदोन्नतीमध्ये आरक्षण देता येणार नाही. मा. उच्च न्यायालयाच्या दि. ४.८.२०१७ च्या आदेशाच्या भंग होईल अशी कोणतीही कार्यवाही करण्यापूर्वी मा. सर्वोच्च न्यायालयाकडून आदेश प्राप्त करुन घेणं आवश्यक आहे. राज्य शासनाच्यावतीने यापूर्वी झालेल्या युक्तीवाद करताना विशेष समुपदेशींनी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि. ४.०८.२०१७ रोजीच्या निर्णयास स्थगिती देण्याची विनंती मा. सर्वोच्च न्यायालयात केली होती, तथापि, त्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने कोणतेही आदेश न देता, मा.सर्वोच्च न्यायालयाने एम. नागराज या प्रकरणी दि. १९.१०.२००६ रोजी दिलेल्या निर्णयाचा पुर्नविचार करावा किंवा कसे यासाठी घटनापीठाची रचना करण्याकरिता मा.मुख्यन्यायाधीश, सर्वोच्च न्यायालय यांच्या पुढे ठेवावे असे आदेश दिले होते. दिनांक ११.०७.२०१८ रोजी झालेल्या सुनावणीत मा. सर्वोच्च न्यायालयाने एम. नागराज प्रकरणी दिलेल्या निकालाचा पुर्नविचार करणे आवश्यक आहे किंवा कसे याबाबत दिनांक ०३.०८.२०१८ रोजी सुनावणी निश्चित केली आहे. सद्यस्थितीत प्रशासकीय कामकाज सुरळीत चालण्याच्या दृष्टीने पदोन्नतीची प्रक्रीया पूर्णपणे स्थगित करणे उचित ठरत नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात जेष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्याचे आदेश विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने दिनांक २९.१२.२०१७ रोजी निर्गमित करण्यात आले आहे. अशा पदोन्नती देताना जेष्ठतेनुसार पात्र असणाऱ्या व दिनांक २५.५.२००४ नंतर आरक्षणा अंतर्गत पदोन्नती मिळालेली नाही अशा मागासवर्गीय अधिकारी / कर्मचारी यांना देखिल पदोन्नती देण्यात येत आहे सद्यस्थितीत प्रकरण न्याय प्रविष्ठ असून शासन मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती मधील आरक्षण अबाधीत ठेवण्यासाठी प्रयत्नशिल आहे.

---